# प्रकरण पाचवे

## उपसंहार

# प्रकरण पाचवे

# उपसंहार

# प्रकरण : पाचवे

## उपसंहार

दिलीप पुरुषोत्तम चित्रे यांच्या कथात्म साहित्याचा अभ्यास प्रस्तुत लघु प्रबंधात केला आहे. दिलीप पुरुषोत्तम चित्रे हे कवी, समीक्षक, कथालेखक, पत्रकार, अध्यापक, चित्रकार म्हणून सर्वपरिचित आहेत. कवी म्हणून गेल्या अर्धशतकातील त्यांचे योगदान आधुनिक मराठी कवितेला एक उंची प्राप्त करून देणारे आहे. अस्तित्वशोधाशी निगडीत असणारे अनुभवविश्व त्यांच्या एकूण साहित्याचा मुख्य गाभा आहे. पारंपरिक रूढ कवितेच्या आकृतिबंधाला नाकारून चित्रे यांनी आपले एक नवे कविताविश्व उभे केले आहे. मर्ढेकरोत्तर काळातील कवितेचा विकास घडविण्यात दिलीप चित्रे यांचे महत्त्वाचे योगदान आहे. जाणिवेच्या तसेच अभिव्यक्तीच्या बाबतीत चित्रे यांची कविता नवी ठरली आहे. त्यांनी आपल्या साहित्यातून अनेकविध संवेदनांचा सौंदर्याविष्कार प्रगल्भ अशा भाषेद्वारा घडवला आहे. त्यांच्या साहित्यातून व्यापक अशी जीवनदृष्टी व चिंतनशिलता प्रकट होते. गेल्या अर्ध शतकात चित्रे यांनी अन्य विविध साहित्यप्रकारातून स्वत:ला व्यक्त केले आहे.

१९६० नंतरचे मराठी कथात्म साहित्य वेगवेगळ्या साहित्यप्रवाहातून आविष्कृत होऊ लागले. दलित, ग्रामीण, स्त्रीवादी, आदिवासी साहित्यप्रवाहांनी मराठी कथाविश्व समृद्ध केले. १९६० नंतरच्या कालखंडात प्रयोगशील तसेच महानगरीय जाणिवा व्यक्त करणारा एक महत्त्वाचा साहित्यप्रवाह जोम धरू लागला. या प्रवाहामध्ये लेखन करणाऱ्यांमध्ये विलास सारंग, अनिल डांगे, भाऊ पाध्ये, श्याम मनोहर, श्री.दा.पानवलकर, कमल देसाई इत्यादींचा समावेश करता येईल. आधुनिक प्रयोगशील लेखन करणारे तसेच आपल्या साहित्यामधून महानगरीय जाणीवा व्यक्त करणारे दिलीप चित्रे हे एक महत्त्वाचे लेखक आहेत. 'अस्तित्वशोध' हे त्यांच्या कथात्मलेखनाचे मुख्य सूत्र आहे. मानवी अंतर्मनाची स्वैर आंदोलने त्यांनी आपल्या कथात्म साहित्यातून उलगडण्याचा प्रयत्न केला आहे. या कालखंडातील महत्त्वाची ठरणारी नागरकथा चित्रे यांनी लिहिली आहे. माणसाचे एकाकीपण नियतीशरणता, परात्मता,

अस्तित्वहीन जीवन, लैंगिक गरजा यांचा एक प्रगल्भ पातळीवरील आविष्कार दिलीप चित्रे अस्तित्ववादाच्या त्याचप्रमाणे अस्तित्ववादाच्या अनुषंगाने मांडतात. चित्रे यांच्या कथात्म साहित्याला पारंपरिक, रूढ वाङ्मयीन संकेतांचा, कथासाच्याचा सोस नाही. पूर्णपणे नव्या रूपात त्यांचे कथात्म साहित्य आविष्कृत होते. आशय, विषय, अनुभवविश्व, आविष्कार त्याचप्रमाणे भाषाशैलीच्या बाबतीत रूढ वाङ्मयीन परंपरेतील नियमांना चित्रे फाटा देतात व आपल्या सर्जनशील अनुभवविश्वाचे प्रकटीकरण करण्यासाठी एक वेगळ्या नवीन विश्वाची उभारणी करतात. आशयदृष्ट्या, भाषिकदृष्ट्या तसेच अभिव्यक्तीदृष्ट्या चित्रे यांचे कथात्म साहित्य हे १९६० नंतरचे एक महत्त्वाचे लेखन आहे. त्यांच्या कथात्म लेखनाच्या वैशिष्ट्यपूर्ण तेचा विचार प्रस्तुत लघुप्रबंधात केला आहे.

१९६८ साली दिलीप चित्रे यांचा पहिला कथासंग्रह 'ऑर्फियस' तर १९९५ साली 'चतुरंग' हा लघुकांदबरीसंग्रह प्रसिद्ध झाला. 'ऑर्फियस' मध्ये बारा कथा तर 'चतुरंग' मध्ये चार लघुकांदबऱ्यांचा समावेश आहे. दिलीप चित्रे यांच्या कथात्म लेखनावर अस्तित्ववादी तसेच अतिवास्तववादी तत्त्वप्रणालीचा / विचारप्रणालींचा मोठा प्रभाव आहे. 'अस्तित्वशोध' हा त्यांच्या कथात्म लेखनाचा मुख्य गाभा आहे. महानगरीय एकाकी जीवन, जगण्यातला फोलपणा, निराशा, नियतीशरणता, परात्मता, चिंतनशीलता इत्यादी अनेक सूत्रे त्यांच्या कथात्म साहित्यातून प्रकट होतात. समकालीन कथात्म साहित्यपेक्षा चित्रे यांचे कथात्म साहित्य अगदी भिन्न स्वरूपाचे आहे. आशय, आविष्कार, अनुभूती तसेच भाषेचा मुक्त न्यास या बाबतीतही दिलीप चित्रे यांचे कथात्म साहित्य सर्वस्वी वेगळ्या स्वरूपाचे ठरते. चित्रे यांच्या भाषेवर पूर्व परंपरेच्या भाषेचे दडपण नाही. कोणताही मानवी अनुभव संकेताचे बंधन न बाळगता ते आपल्या कथात्म साहित्यातून मांडतात. त्यांचे कथात्म साहित्य नात्याचा, संस्कृतीचा, नीतिमत्तेचा, चारित्र्याचा फोलपणा मांडण्याचे प्रयत्न करते. मानवी जीवनातील जगण्याची धडपड चित्रे अस्तित्वशोधातून मांडतात. दिलीप चित्रे यांच्या कथात्म साहित्याचा अभ्यास करण्यासाठी प्रस्तुत लघुप्रबंधाची पाच प्रकरणात विभागणी केली आहे.

पहिल्या प्रकरणात कथा व लघुकादंबरी या साहित्य प्रकारांच्या तात्त्विक विचाराबरोबर १९६० नंतरच्या कथा व लघुकादंबरी वाङ्मयाची वाटचाल संक्षेप रूपाने मांडली आहे. कथा हा एक महत्त्वाचा साहित्यप्रकार आहे. कथाप्रियता ही मानवी मनाची एक स्वाभाविक प्रवृत्ती आहे. कथा हा एक अत्यंत लवचिक वाङ्मय प्रकार आहे. मर्यादित अवकाशात विस्तृत जीवनानुभव मांडण्याची ताकद कथा या वाङ्मय प्रकारामध्ये आहे. नानवी जीवनाचे, समाजाचे लघुदर्शन घडविणे, वाचकांवर एकात्म स्वरूपाचा संस्कार घडविणे, भाषेचा अनेकविध वापर करणे ही कथा या वाङ्मय प्रकाराची वैशिष्ट्ये आहेत. एकूणच संपन्न कलानुभव तसेच जीवनानुभव देण्याची ताकद कथा या साहित्य प्रकारामध्ये सामावलेली दिसून येते. यानंतर लघुकादंबरीसंबधीचा काही एक विचार मांडला आहे. लघुकादंबरीला 'कादंबरिका', 'छोटी कादंबरी' अशी पर्यायी नावे मराठीत आहेत. कथेपेक्षा मोठा व कादंबरीपेक्षा लहान असणारा साहित्य प्रकार म्हणजे लघुकादंबरी असे तिचे स्वरूप आहे. कथा व दीर्घकथा हे एका गटात मोडणारे आणि लघुकांदवरी व कादंबरी हे एका गटात मोडणारे साहित्यप्रकार म्हणून ओळखले जातात. लघुकादंवरी ही कादंबरीच्या रचनातंत्राने विकसीत होते. कथानक, चरित्र चित्रण, आवाका यांचे लघुदर्शन लघुकादंबरीतून होते. त्याचबरोबर विस्ताराच्या दृष्टीनेही लघुकादंबरी लघु ठरते. १९६० नंतरच्या मराठी कथेचा विचार करता तिचे विविधांगी स्वरूप लक्षात येते. १९६० नंतर मराठी कथा दलित, ग्रामीण, स्त्रीवादी, नागर इत्यादी साहित्य प्रवाहातून आविष्कृत होऊ लागली. वर्षानुवर्षे दबल्या गेलेल्या दलितांच्या आवाजाला कंठ फुटला, ग्रामवास्तव ग्रामीण साहित्यातून प्रकट होऊ लागले. स्त्री हुंकाराचा आविष्कार स्त्रीवादी साहित्यातून होऊ लागला तर नागर परिसरातील व्यक्तिकेंद्री जीवन नागर साहित्यातून साकार होऊ लागले. नागर कथात्म साहित्यामध्ये उल्लेखनीय लेखन करणारे दिलीप चित्रे हे एक समर्थ लेखक होत. १९६० नंतरच्या लघुकादंबरीचा विचार करता तिचेही विशेष रूप पहावयास मिळते. हा वाङ्मयप्रकार विकसीत करण्यामागे चिं. त्र्यं. खानोलकर, हमीद दलवाई, बाबूराव बागूल, केशव मेश्राम, भारत सासणे, मोहन पाटील, गौरी देशपांडे, कमल देसाई, वसंत आबाजी डहाके यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. दिलीप चित्रे यांनी

आपल्या 'चतुरंग' या लघुकादंबरी संग्रहातून हा वाङ्मयप्रकार समर्थपणे हाताळला आहे.

दुसऱ्या प्रकरणामध्ये चित्रे यांच्या कथात्म साहित्याच्या आशयसूत्रांचा विचार केला आहे. दिलीप चित्रे यांच्या कथात्म साहित्यातून विविध आशयसूत्रे व्यक्त झाली आहेत. या आशयसूत्रांचा त्यांच्या कथात्म साहित्यकृतींच्या आशयानुरूप चर्चा प्रस्तुत प्रकरणात केली आहे. आरंभीच्या विवेचनात चित्रे यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या घडणीसंबंधीची संक्षिप्त मांडणी केली आहे. त्यांच्या संबंध कथात्म साहित्यावर अस्तित्ववादी विचारसरणीचा मोठा प्रभाव आहे. त्यासाठी अस्तित्ववादी विचारसरणीचे थोडक्यात विवेचन केले आहे. मानवी जगण्याशी निगडीत असणाऱ्या या विचारसरणीतून चित्रे यांचे कथात्म साहित्य उलघडत जाते. देहाचे प्रश्न व त्याची उकल करणे यावर अस्तित्ववादाचा भर असतो लैंगिक प्रेरणा हा देहाचा प्रमुख प्रश्न असतो. मानवी जगण्यातील साशंकता, भ्रमनिरास, परमेश्वराविषयी नकार, अपराधबोध, परात्मता, भय, चिंता, मृत्यू हे अस्तित्ववादाचे विषय आहेत. परात्मता, एकाकीपणा, तुटलेपणा इत्यादी जाणीवेतून अस्तित्ववादी आशयाचा आविष्कार होतो. हा आविष्कार चित्रे यांच्या 'ऑर्फियस', 'व्हायरस', 'केसाळ काळभोर पिल्लू', 'स्कॉर्पिओ', 'टाइपरायटर' इत्यादी कथांतून होतो. महानगरीय जीवन हे चित्रे यांच्या कथात्म साहित्याचे महत्त्वाचे आशयसूत्र आहे. चित्रे यांनी महानगरातून एकाकीपणे जीवन जगणाऱ्या व्यक्तिरेखांचा वेध घेतला आहे. प्रचंड अशा पसरलेल्या महानगरातून माणूस अस्तित्वहीन जीवन जगत आहे त्याच्या एकाकीपणाचा संदर्भ चित्रे अस्तित्ववादाच्या अनुषंगाने मांडतात. स्त्री-पुरूष संबंध हे एका वेगळ्या जाणीवेचे द्योतक आहेत. अस्तित्वाचा उत्कट शोध संबंधातून घेता येतो.

अशाप्रकारे सार्त्रप्रणित तसेच किर्केगार्डप्रणित अस्तित्ववादापेक्षा चित्रे यांचा अस्तित्ववाद वेगळ्या पद्धतीने साकार होतो. चित्रे यांच्या बहुतेक कथात्म साहित्यकृतीतून अस्तित्ववादाचा त्यांच्या कथात्म साहित्यावर असणारा प्रभाव ठळकपणे दिसून येतो. या अस्तित्ववादी जाणीवा प्रकट करणाऱ्या कथांची चर्चा केली आहे. तसेच महानगरीय जाणीवांचे स्वरूप अभ्यासून स्त्री-पुरुष संबंधातून प्रकट होणाऱ्या कथांची चर्चा प्रस्तुत प्रकरणात विस्ताराने केली आहे. अतिवास्तववादी विचारसरणी ही आजच्या आधुनिक काळातील प्रभावी

विचारसरणी आहे. अतिवास्तववादाविषयी थोडक्यात विवेचन प्रकरणाच्या दुसऱ्या टप्प्यात केले आहे. वास्तवापलिकडचे जे वास्तव आहे त्या वास्तवाचा वेध अतिवास्तवाला अभिप्रेत आहे. अतिवास्तववादी लेखनात मानवी मनाच्या जाणिवेपलीकडील स्वप्नावस्थेतील विश्व, अज्ञात लैंगिक प्रेरणा तसेच अभाविक शारीरिक क्रिया यावर आधारलेले जे वास्तव आहे त्या जाणीवेचे वास्तव प्रकट होत असते. 'चतुरंग' या लघुकादंबरीसंग्रहातील चारही लघुकादंबऱ्यावर अतिवास्तववादी विचारप्रणालीचा प्रभाव आहे. जादूमय यंत्रात्मकतेचा आविष्कार, स्व चा अस्तित्त्व शोध, स्त्रीच्या अंतर्मनाचा वेध, अशा स्वरूपाची आशयसूत्र या लघु कादंबऱ्यातून प्रकटतात. या प्रकारची चर्चा प्रस्तुत प्रकरणात केली आहे.

लघुप्रबंधाच्या तिसऱ्या प्रकरणात दिलीप चित्रे यांच्या कथात्म साहित्यातील व्यक्तिरेखांचा विचार केला आहे. त्यांच्या कथात्म साहित्यातील व्यक्तिरेखा अस्तित्वशोधाच्या व एकाकीपणाच्या जाणीवेने प्रभावीत झालेल्या दिसतात. व्यक्तिरेखांची विविधता चित्रे यांच्या कथात्म साहित्यामध्ये आढळत नाही. त्यामुळे त्यांची कथात्म साहित्यकृती एखाद्याच व्यक्तिरेखेवर अधिक लक्ष केंद्रीत करते. व्यक्तिचित्रणातील बाह्यवर्णनापेक्षा आणि त्यांच्या स्वभाववैशिष्ट्यांपेक्षा चित्रे यांना मानवी अस्तित्वाचे तसेच त्यांच्या एकाकीपणाचे प्रश्न प्रभावी वाटत असल्यामुळे व्यक्तिरेखांचे बाह्यवर्णन तसेच स्वभाववैशिष्ट्ये यांच्या व्यक्तिचित्रणात येत नाही. मानवी जगण्यातले अस्तित्वविषयक, एकाकीपणाविषयक, देहाचे प्रश्न आणि सामाजिक-सांस्कृतिक समस्यांपेक्षा व्यक्तिनिष्ठ समस्यांचा अनुभव घेणाऱ्या व्यक्तिरेखा त्यांच्या कथात्म साहित्यातून येतात. 'ऑर्फियस' या कथासंग्रहातील बहुतेक कथांतील व्यक्तिरेखा ह्या अस्तित्वशोधासाठी धडपडणाऱ्या, एकाकी जीवन जगणाऱ्या आहेत. या व्यक्तिरेखा एकाकीपणातील मूलभूत प्रश्न अनुभवणाऱ्या आणि देहाची आदिम प्रेरणा 'लैंगिकता' या प्रश्नाची सोडवणूक करणाऱ्या आहेत. तर 'चतुरंग' या लघुकादंबरी संग्रहातील बहुतांशी व्यक्तिरेखाही स्वत:च्या अस्तित्वविषयक प्रश्नांनी गोंधळलेल्या दिसतात. या मन:स्थितीचे चित्रण चित्रे अतिवास्तववादी पद्धतीने घेतात. चित्रे यांच्या कथात्म साहित्यातील व्यक्तिरेखा काही ठिकाणी विचित्र, विक्षिप्त स्वरूपात प्रकट होतात. त्यांची ही स्वभाववैशिष्ट्ये

कथानकाच्या आशयाशी संबंधीत असतात. व्यक्तिरेखांची गर्दी व विविधता नसलेले चित्रे यांचे कथात्म साहित्य पुरूषकेंद्री आहे. उपरोक्त विवेचनाच्या आधारे चित्रे यांच्या कथात्म साहित्यातील व्यक्तिरेखांचे वर्गीकरण केले आहे. त्यामध्ये अस्तित्वशोधासाठी धडपडणाऱ्या व्यक्तिरेखा, एकाकीपणे जीवन जगणाऱ्या व्यक्तिरेखा अलौकिक व्यक्तिमत्वाच्या व्यक्तिरेखा आणि स्त्री व्यतिरेखा अशी काही एक चर्चा प्रस्तुत प्रकरणात केली आहे.

चौथ्या प्रकरणात दिलीप चित्रे यांच्या कथात्म साहित्याच्या वाङ्मयीन विशेषांचा विचार केला आहे. १९६० नंतरच्या कालखंडातील दिलीप चित्रे हे एक महत्त्वाचे कथात्म लेखक आहेत. त्यांच्या भाषेचे स्वरूप, निवेदन पद्धती, विविध तंत्रांचा वापर, प्रतिमा-प्रतिकांचा वापर, वाक्यरचना, संवाद, गद्यशैली इत्यादी सर्वच स्तरातून त्यांच्या कथात्म साहित्यातील नवता दिसून येते. आरंभीच्या विवेचनात चित्रे यांच्या भाषेच्या स्वरूपाची चर्चा केली आहे. त्यांच्या एकूणच भाषाविषयक तसेच साहित्य लेखनविषयक भूमिकेविषयी चर्चा केली. त्यांची भाषा रूढ पारंपरिक कथात्म साहित्याच्या भाषेहून वेगळी, प्रगल्भ आहे. भाषेबाबत ते कमालीचे जागृत असतात. त्यांची भाषा विविधप्रतिक्रियाक्षम आहे. अर्थाचीं अनेक वलये निर्माण करणे हे त्यांच्या भाषेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. त्यांची निवेदनाची भाषा कधी कधी अनाकलनीय व अतर्क्यतेच्या पातळीवर जाते. म्हणूनच त्यांचे कथात्म साहित्य वाचताना प्रथमदर्शनीच तिचे रूढ मराठी कथात्म साहित्यापेक्षा असलेले वेगळेपण लक्षात येते.

निवेदनामध्ये चित्रे यांनी विविध पद्धतीचा वापर केला आहे. प्रथमपुरूषी निवेदनाबरोबरच प्रथम पुरूषी प्रथम पात्र असणाऱ्या निवेदन पद्धतीचा वापर, तृतीयपुरूषी निवेदन पद्धतीबरोबरच सर्वज्ञ सर्वसाक्षी तृतीय पुरूषी निवेदन पद्धती, सर्वसामान्याप्रमाणे निरीक्षक असणारी तृतीय पुरूषी निवेदन पद्धतीसारख्या तसेच प्रथम पुरूषी व तृतीयपुरूषी निवेदन पद्धतींचा एकाच वेळी वापर करून त्यांनी आपली प्रयोगशील निवेदन पद्धती घडविली आहे. चित्रे यांनी रूढ पारंपरिक भाषेची मोडतोड करून आपली नवी भाषा घडविली आहे. चित्रे प्रतिमा-प्रतिकांचा प्रभावी वापर करतात. त्यांच्या कथात्म साहित्यातील प्रतिमा-प्रतिके विलक्षण तसेच सर्वसामान्य वाचकांच्या आकलन क्षमतेपलिकडच्या आहेत. त्याचप्रमाणे

अतिवास्तववादी लेखनतंत्राचा वापर, स्वप्नसदृश्य तंत्राचा वापर, वाक्यरचना, संवाद, काव्यात्म निवेदन, गद्यशैली या स्तरातूनही त्यांच्या प्रयोगशील वाङ्मयीन विशेषांचा प्रत्यय येतो. उपरोक्त सर्व विवेचनाच्या आधारे प्रस्तुत प्रकरणात चर्चा केली आहे.

दिलीप चित्रे यांच्या कथात्म साहित्याचे वेगळेपण शोधताना काही निष्कर्ष काढता येतील ते पुढीलप्रमाणे सांगता येतील.

दिलीप चित्रे यांच्या कथात्म साहित्य हे रूढ, पारंपरिक कथात्म साहित्याहून भिन्न ठरते. त्यांच्या कथात्म साहित्याची घडणच एका वेगळ्या पातळीवर झाली आहे. त्यांच्या संबंध साहित्यलेखनावरच अस्तित्ववादी तसेच अतिवास्तववादी या पाश्चिमात्य विचारप्रणालीचा / तत्वप्रणालींचा प्रभाव आहे. चित्रे यांचे कथात्म साहित्य रूढ मराठी कथात्म साहित्याच्या संकेतव्यूहाला नाकारणारे आहे.त्यांच्या कथात्म साहित्यातील आशयसूत्रे, जीवनचित्रणे, कथानक, स्थळकाळ, तंत्रात्मकतेचा वापर इत्यादी सर्व एका विशिष्ट्य प्रयोगशीलतेच्या पातळीवरून येते.अर्थाच्या आणि आशयाच्या बाबतीत त्यांचे कथात्म साहित्य अनेक शक्यता निर्माण करणारे आहे.प्रयोगशीलता हा चित्रे यांच्या कथात्म साहित्याचा महत्त्वाचा विशेष आहे.हे प्रयोग केवळ प्रयोग म्हणून करत नाहीत तर या प्रयोगामागे त्यांची एक कलादृष्टी आहे. त्यांची ही कलादृष्टी मराठी कथात्म साहित्यामध्ये उल्लेखनीय आहे.

अस्तित्वशोध हे चित्रे यांच्या कथात्म साहित्याचे प्रमुख आशयसूत्र आहे. या अस्तित्वशोधातूनच चित्रे यांच्या कथात्म साहित्याची जडणघडण झाली आहे. मानवाचे अस्तित्वविषयक मूलभूत प्रश्न चित्रे आपल्या कथात्म साहित्यामध्ये मांडण्याचा प्रयत्न करतात. मानवी जीवनातील कोणतेही क्षेत्र साहित्यामध्ये निषिद्ध मानले जाऊ नयेत. मानवी जीवनानुभवाच्या सर्व क्षेत्रावर साहित्याने प्रकाशझोत टाकला पाहिजे या विचारसरणीचा चित्रे पुरस्कार करतात. व संबंध मानवी जीवनातील महत्त्वाच्या प्रश्नांना आपल्या कथात्म साहित्यातून मूर्त रूप देतात माणसाचे मूलभूत एकाकीपण, त्याच्या देहाचे प्रश्न, नियतीशरणता, निराशा, परात्मता, लैंगिक प्रश्न इत्यादी गोष्टीतील मर्म चित्रे आपल्या कथात्म साहित्यातून उलगडून दाखवतात.

अशाप्रकारे अनेकविध वैशिष्ट्यातून दिलीप चित्रे यांचे कथात्म साहित्य रूढ मराठी कथात्म साहित्याला छेद देते. आपल्या वेगळ्या वैशिष्ट्यासह हे कथात्म साहित्य वाचकांना एक वेगळाच विलक्षण अनुभव देते. नागर संवेदनशिलता, व्यक्तिकेंद्रितता, असतेपणाचे प्रश्न, अतिवास्तववादी लेखन तंत्र, भाषेच्या पातळीवरची प्रयोगशीलता या वैशिष्ट्यपूर्णतेमुळे चित्रे यांचे कथात्म साहित्य वैशिष्ट्यपूर्ण ठरते. १९६० नंतरच्या मराठी कथात्म साहित्यामध्ये दिलीप चित्रे यांचे साहित्य महत्त्वाचे ठरते व आपल्या स्वायत्त वैशिष्ट्यांसह आपले वेगळे स्थान निर्माण करते.